# पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर

## प्रेस नोट दि.०७/०३/२०१९

## दि.०६/०३/२०१९ रोजी रात्रौ ००/०० वा.ते २४/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

**भाग-१ ते ५ चे गुन्हे**

१

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | शिवाजीनगर पो स्टे १७७/१९,भादविक ४५७,४२७,५११ |
| **फिर्यादी** | अमर कुलकर्णी,वय-३५ वर्षे,रा.बावधन,पुणे |
| **आरोपी** | एक अनोळखी इसम |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०६/०३/२०१९ रोजी पहाटे ०४/०० ते ५/०० वा.चे दरम्यान स्टेट बॅक ऑफ इंडीया बॅंक येथील एटीएम सेंटर मध्ये युनिर्व्हसिटी रोड,म्हसोबा गेट चौक,शिवाजीनगर,पुणे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे स्टेट बॅक ऑफ इंडिया युनिव्हसीटी रोड,पुणे येथील बॅंकेत मुख्य मॅनेजर या पदावर कार्यरत आहेत. सदर स्टेट बॅक ऑफ इंडीया बॅंकेचे एटीएम सेंटर मध्ये असलेल्या सीसीटीव्ही कॅमेरा मध्ये दिसत असलेल्या,एक अनोळखी इसमाने स्टेट बॅक ऑफ इंडीया या बॅकेच्या मुख्य दरवाजास असलेले लोखंडी शटर,लोखंडी सळईच्या सहाय्याने उचकटण्याचा प्रयत्न करुन,त्यास असलेले कुलुप तोडण्याचा प्रयत्न करुन,सुरक्षितेतेकरीता बसविण्यात आलेला सीसीटीव्ही कॅमेरा फोडुन तो उचकटवुन,सुमारे अंदाजे १५००/- रुपयाचे नुकसान करुन घरफोडी चोरी करण्याचा प्रयत्न केला आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. जे.डी.खलाणे ८३८००९६०३० |

२

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | विमानतळ पो स्टे १११/१९,भादविक २७९,३०४(अ),मोव्हेॲक्ट १८४,११९/१७७ |
| **फिर्यादी** | मदन जोशी,वय-६३ वर्षे,रा.कांचननगर,जुने जालना |
| **आरोपी** | पीएमपीएमएल बसवरील चालक (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०४/०१/२०१९ रोजी सकाळी १०/३० वा.चंदननगर चौक नगर-पुणे रोडवर चंदन नगर,पुणे |
| **तपशिल** | विमानतळ पो स्टे अ.मयत रजि.नं.१०/१९,सीआरपीसी १७४ अन्वये मयताचे झाले तपासाचे चौकशीअंती कागदपत्राचे अवलोकन करता,यातील फिर्यादी यांचा मुलगा चैतन्य मदन जोशी,वय-३३ वर्षे,रा.१० चैतन्य,कांचननगर, गणपती मंदीरा समोर,जुने जालना हा मोटार सायकलवरून जात असताना,यातील नमुद पीएमपीएमएल बसवरील चालकाने त्याचे ताब्यातील बस ही वाहतुकीचे नियमांकडे दुर्लक्ष करून,हयगयीने,अविचाराने व भरधाव वेगात चालवुन,नमुद ठिकाणी चैतन्य मदन जोशी यांस समोरून जबर ठोस मारून,गंभीर जखमी करून,त्याचे मृत्युस कारणीभुत झाला. (मयत इसम याचेवर उपचार चालु असताना,तो खाजगी दवाखान्यात दि.१२/०१/२०१९ रोजी मयत झाला आहे. फिर्यादी यांची मानसिक स्थिती ठिक नसल्याने त्यांनी आज रोजी तक्रार दिली आहे.) |
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरी. सलीम चाऊस ८८०६१६६१०० |

३

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | कोंढवा पो स्टे २०९/१९,भादविक ३०६ |
| **फिर्यादी** | श्रीमंत गायकवाड,वय-७२ वर्षे,रा.गोकुळनगर,कात्रज-कोंढवा रोड,पुणे |
| **आरोपी** | एक इसम,रा.गोकुळनगर कात्रज-कोंढवा रोड,पुणे व इतर एक (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०४/०३/२०१९ रोजी सकाळी १०/०० वा.गोकुळनगर कात्रज-कोंढवा रोड,गल्ली नं.४, कोंढवा-बुद्रुक,पुणे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांची मुलगी अभिलाशा श्रीमंत गायकवाड हिचेबरोबर यातील नमुद इसमाने ओळख वाढवुन,तीचेबरोबर लग्न करण्यास नकार देवुन,इतर इसमाने तीचे लग्नास हरकत घेऊन अभिलाशा हिस मानसिक त्रास दिल्याने,तीने राहते घरी ओढणीने गळफास घेवुन आत्महत्या करण्यास प्रवृत्त केले. |
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरी. पंकज पवार ८८०५९८९४७२ |

४

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | दत्तवाडी पो स्टे १५४/१९,भादविक ४२०,३४ |
| **फिर्यादी** | महाजबीन शेख,वय-४५ वर्षे,रा. भाग्योदयनगर,कोंढवा-खुर्द,पुणे |
| **आरोपी** | १.एक इसम,रा.पर्वती दर्शन,पुणे २.एक इसम,रा.सांगली,पुणे (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | सन २०१४ ते आजपावेतो पर्वती दर्शन पुणे येथे |
| **तपशिल** | यातील नमुद अ.क्र.१ या इसमाने फिर्यादी यांना सन २०१४ मध्ये फिर्यादी यांना अ.क्र.२ हा विकसीत करीत असलेल्या बेळगाव येथिल जमिनीचे व्यवसायात एकुण १७,५०,०००/- रुपये गुतंवण्यास भाग पाडुन,सदर गुतंवणुकीतुन जास्त परताव्याचे अमिष दाखवुन,पर्वती दर्शन,पुणे येथील घरी बैठक घेवुन,फिर्यादी यांची मुळ मुद्दल १७,५०,०००/- रूपये रकम सांगली येथे देवुन,सदर रकमेवरील २०१६ पर्यन्तचा मिळणारा परतावा १६,०००,००/- रुपये अशी सर्व मिळुन एकुण ३३,५०,०००/- रूपये फिर्यादी यांना परत न देता,त्यांची फसवणुक केली आहे. (सदरचा गुन्हा हा तक्रारी अर्जावरून दाखल करण्यात आला आहे.) |
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरी. एस.एस.सलगर ७५८८०९८२४४ |

५

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | सिंहगड पो स्टे २०७/१९,भादविक ४१९,४२०,माहिती व तंत्रज्ञान का.क.६६(क)(ड) |
| **फिर्यादी** | एक महिला,वय-२९,रा.न-हे,पुणे |
| **आरोपी** | अज्ञात मोबईल व बँकेचा खातेधारक |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | माहे जुन २०१८ ते दि.१५/११/२०१८ रोजीचे कालावधीत १५/३० वा.चे दरम्यान फिर्यादीचे राहते घरी ऑनलाईन माध्यमाव्दारे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांनी Shine.com या साईटवर नोकरी करीता आपले नावाची नोंद केली होती. परंतु त्यांचेकडुन कोणत्याही प्रकारे फोन आला नसलयाने,फिर्यादी यांनी त्यांना फोन करून सर्व्हिस बंद करण्याची व पैसे परत करण्याची मागणी केली होती. काही दिवसांनी फिर्यादी यांना नमुद इसमांनी फोन करून त्यांची सर्व्हिस बंद करण्यासाठी Shinejob.org.in याचेवर माहिती भरण्याकरीता सांगुन,फिर्यादी यांचेकडुन ओटीपीची माहिती घेवुन,फिर्यादी यांचे बँकेचे खात्यावरील ५०,०००/- रुपये काढुन घेवुन,फिर्यादी यांची फसवणुक केली आहे. (सदरचा गुन्हा हा तक्रारी अर्जावरून दाखल करण्यात आला आहे.) |
| **त.अंमलदार** | वरिष्ठ पो.निरी. दुर्योधन पवार ९८२२८३०६६८ |

**प्रेसनोट** दिनांक २५/०२/२०१९

**छायाचित्र स्पर्धा** "पोलीस इन ॲक्शन नागरीकांची सेवा आणि सुरक्षितेसाठी कार्यरत पोलीस" या विषयावर विनामुल्य छायाचित्र स्पर्धेबाबत.

पुणे पोलीस आयुक्त, पुणे शहर यांच्या संकल्पनेतून १. प्रेस/ प्रोफेशनल छायाचित्रकार, २. हौशी छायाचित्रकार ३. पोलीस खात्यातील अधिकारी/कर्मचारी त्यांचे कुटूंबिय या गटांकरीता "पोलीस इन ॲक्शन - नागरीकांची सेवा आणि सुरक्षिततेसाठी कार्यरत पोलीस" या विषयावर **विनामुल्य छायाचित्र** स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. सदर स्पर्धेकरीता हौशी छायाचित्रकार या गटांमध्ये कोणीही नागरिक सहभागी होवु शकतो.

सदर स्पर्धेकरीता प्रथम क्रमांक - रोख ५००० रू व शिल्ड, द्वितीय क्रमांक, - रोख ३००० रू व शिल्ड, तृतीय क्रमांक - रोख २००० रू व शिल्ड व उत्तेजनार्थ २ बक्षीसे देण्यात येणार आहेत.

प्रवेशिका http//www.pixlent.com/punepolicephotocontet या संकेतस्थळावर उपलब्ध असून फोटो (इमेज) वरील दिलेल्या संकेत स्थळावर **ऑनलाईन** पाठवावेत.

<u>स्पर्धेसाठीचे नियम व अटी-</u>

१. प्रत्येक स्पर्धकाने जास्तीत जास्त ५ इमेज JPG फॉरमॅटमध्ये ३०० DPI 5 MB साईजचे ओरीजनल व स्वत काढलेल्या इमेज असाव्यात. इमेजवर कोणत्याही प्रकारचे वॉटरमार्क, लोगो, चिन्ह नसावे
२. दिनांक २५/०२/२०१९ रोजीची ही मुदत दि.१२/०३/२०१९ पर्यंत वाढविली असुन दि.१२/०३/२०१९ पर्यंत प्रवेशिका व फोटो नमुद संकेतस्थळावर स्विकारण्यात येतील
३. निवड झालेले फोटोग्राफ्स हे आयोजक आपल्या प्रदर्शनासाठी व माहिती पुस्तीकेसाठी वापरू शकतील.
४. इमेज पाठविण्यासाठी http//www.pixlent.com/punepolicephotocontet या संकेतस्थळाचा वापर करावा. सदरचे संकेतस्थळ **रजिस्ट्रेशन केल्यानंतरच** या स्पर्धेत भाग घेता येईल.
५. प्रत्येक स्पर्धकाने त्याचा ईमेल आयडी व मोबाईल नंबर देणे आवश्यक आहे.
६. मोबाईल किंवा स्मार्ट फोन ने काढलेली छायाचित्रे सुध्दा स्पर्धेत पाठविता येतील.
७. फोटोग्राफ निवडीसाठी परीक्षक समितीचा निर्णय अंतिम राहील.

**छायाचित्र स्पर्धेसाठी पुणे शहरातील १. प्रेस/प्रोफेशनल छायाचित्रकार, २. हौशी छायाचित्रकार, ३. पोलीस अधिकारी / कर्मचारी तसेच त्यांचे कुटूंबिय असे गट आहेत. हौशी छायाचित्रकार गटात सर्व कॉलेजचे प्रिन्सीपल,व्याख्याते, कॉलेज विद्यार्थी, शिक्षकवृंद, सर्व पत्रकार, उत्सुक व इच्छुक नागरीक यांनी जास्तीत जास्त सहभाग घ्यावा. असे पुणे पोलीसांकडून आवाहन करण्यात येत आहे.**

<u>अधिक माहितीसाठी- संपर्क अधिकारी-</u>

१. श्री. अजित लकडे, पोलीस निरीक्षक, विशेष शाखा, पुणे शहर.- ८३२९८०४८३६




# Police in Action

## for Service & Security of People

Pune Police






To take part & know more, go to

**www.pixlent.com/punepolicephotocontest**

### Photography Contest!

Open to All!

Participate, in one of three groups:

1. **Amateur/ Hobby Photographers**
2. **Police officers, staff & members of their families**
3. **Press/ Professional Photographers**

Prizes in each Group!

1st: **Rs. 5,000**
2nd: **Rs. 3,000**
3rd: **Rs. 2,000**
Two more consolation prizes

**Entry Free!**

Last Date Extended ...
**12 March 2019**

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**